# जिल्याच्या संकेत स्थळा मार्फत या नवरात्र उत्सवात सुमारे 64,806 भाविकानी घेतला श्री तुळजाभवानी देवीच्या ई दर्शनाचा लाभ

महान्यूज

बातमी खात्रीची... माहिती प्रगतीची... वेध भविष्याचा...



सोमवार, १० ऑक्टोंबर, २०१६

**नवरात्रौत्सवात सुमारे 64 हजार 806 भाविकांनी घेतला श्री तुळजाभवानी देवीच्या ई-दर्शनाचा लाभ**

उस्मानाबाद : सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा वेग अतिशय अफाट आहे, जिल्हाधिकारी डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या (NIC) मदतीने जिल्ह्याच्या संकेतस्थळावरुन जनतेसाठी विविध...



सोमवार, १० ऑक्टोंबर, २०१६

**वैदिक होमहवनास विधीवत पुर्णाहुती**

शारदीय नवरात्र महोत्सव-2016 उस्मानाबाद : शारदीय नवरात्र महोत्सवात रविवारी श्री तुळजाभवानी मंदिरात वैदिक होमहवन कार्यक्रम झाला. या सर्व धार्मिक विधी मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ.प्रशांत नारनवरे आणि त्यांच्या पत्नी प्रियंका नारनवरे...



सोमवार, १० ऑक्टोंबर, २०१६

**राज्यातील पहिले `लोकराज्य व्यसनमुक्ती केंद्र` उस्मानाबादचे**

`आम्ही झालो लोकराज्य व्यसनमुक्ती केंद्र` उस्मानाबाद : राज्य शासनाच्या `लोकराज्य` मासिकातील माहितीचा ग्रामीण भागातील जनतेला व विद्यार्थ्यांना लाभ व्हावा. यासाठी जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या `आम्ही झालो लोकराज्य व्यसनमुक्ती...



रविवार, ०९ ऑक्टोंबर, २०१६

**श्री तुळजाभवानी देवीची महिषासूरमर्दिनी अलंकार महापूजा**

Showing Page: 1 of 39 < >

---

महान्यूज

बातमी खात्रीची... माहिती

**नवरात्रौत्सवात सुमारे 64 हजार 806 भाविकांनी घेतला श्री तुळजाभवानी देवीच्या ई-दर्शनाचा लाभ** सोमवार, १० ऑक्टोंबर, २०१६

**उस्मानाबाद :** सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा वेग अतिशय अफाट आहे, जिल्हाधिकारी डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या (NIC) मदतीने जिल्ह्याच्या संकेतस्थळावरुन जनतेसाठी विविध विभागाच्या ऑनलाईन सेवा पुरविण्यात जिल्हा प्रशासनाने नेहमीच एन. आय. सी. मार्फत महत्वाचा वाटा उचलला आहे, याचाच एक भाग म्हणून नवरात्र महोत्सवात बहुतांशी भाविकांना घरबसल्या श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनाचा लाभ देण्यासाठी http://osmanabad.nic.in या संकेतस्थळावर ई-लाईव्ह दर्शन ही सुविधा मागील जवळजवळ तीन वर्षापासून मंदिर प्रशासनाच्या सहाय्याने पुरविण्यात येत आहे.

सर्व भाविकांना यंदाच्या नवरात्रात सुविधा वापरणे सोयीस्कर होण्यासाठी राष्ट्रीय सूचना- विज्ञान केंद्रामार्फत (एन. आय. सी) उस्मानाबाद जिल्हा संकेतस्थळावरील मुख्य पान उघडताच ई-लाईव्ह दर्शन हे ठळकपणे दिसण्याची व त्याला क्लिक करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. जिल्हा सूचना-विज्ञान अधिकारी, राष्ट्रीय सूचना-विज्ञान केंद्र यांच्याकडून यासंदर्भात देण्यात आलेल्या अधिकृत माहितीनुसार यंदाच्या नवरात्रात सुमारे 64 हजार 806 भाविकांनी या सेवेचा लाभ घेतला. तसेच आजपर्यंत जवळ जवळ 12 लाख 12 हजार 260 भाविकांनी याचा लाभ घेतल्याचे दिसून येते.

विशेष बाब म्हणजे या सेवेचा लाभ भारताबाहेरील जगातील इतर बहुतांशी देशामधून घेतला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. या नवरात्रात अमेरिका(1 हजार 681), युनायटेड अरब देश(237), कॅनडा(222), इंग्लंड (208), सिंगापूर(154), ऑस्ट्रेलिया (73), कुवेत(49), जर्मनी(47) व सौदी अरेबिया(42) अशा अनेक देशातील भाविकांनी या सेवेचा लाभ घेतल्याचे आणि यापैकी जास्तीत जास्त भाविक त्यांच्या मोबाईलवरुन या सुविधेचा लाभ घेत आहेत, असे जिल्हा सूचना अधिकारी के.बी. कोंडेकर आणि अतिरिक्त जिल्हा सूचना अधिकारी पी.एन.

G+1 0 Share

**Lokamat Paper:**

# ६५ हजार भाविकांचे 'ऑनलाईन' दर्शन

## नवरात्रोत्सव : आजवरची संख्या बारा लाख

**उस्मानाबाद** : यंदाच्या नवरात्रोत्सव कालावधीत आजवर देशासह विदेशातील तब्बल ६४ हजार ८०६ भाविकांनी कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीचे ऑनलाईन दर्शन घेतले. जिल्हा प्रशासनाच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या 'ऑनलाईन' दर्शनामुळे भाविकांना घरबसल्या श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन घेता आले.

जिल्हाधिकारी डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या मदतीने जिल्ह्याच्या संकेतस्थळावरुन जनतेसाठी विविध विभागांच्या ऑनलाईन सेवा पुरविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नवरात्रोत्सवात बहुतांशी भाविकांना घरबसल्या श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनाचा लाभ देण्यासाठी संकेतस्थळावरुन ई-लाईव्ह दर्शन ही सुविधा मागील तीन वर्षांपासून मंदिर प्रशासनाच्या सहाय्याने पुरविण्यात येत आहे.

सर्व भाविकांना यंदाच्या नवरात्रात सुविधा वापरणे सोयीस्कर होण्याकरिता राष्ट्रीय सूचना, विज्ञान केंद्रामार्फत उस्मानाबाद जिल्हा संकेतस्थळावरील मुख्य पान उघडताच ई-लाईव्ह दर्शन हे ठळकपणे दिसण्याची व त्याला क्लिक करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यंदाच्या नवरात्रोत्सवात ६४ हजार ८०६ भाविकांनी या सेवेचा लाभ घेतला. तसेच आजपर्यंत १२ लाख १२ हजार २६० भाविकांनी याचा लाभ घेतल्याचे दिसून येते.

### विदेशातील भाविकांनाही लाभ

- जिल्हा प्रशासनाच्या ई- लाईव्ह दर्शन सेवेचा लाभ परदेशातील भक्तांनी घेतल्याचे दिसून येत आहे. या नवरात्रात अमेरिका येथील १ हजार ६८१, युनायटेड अरब देशातील २३७, कॅनडा देशातील २२२, इंग्लंडमधील २०८, सिंगापूर मधील १५४, ऑस्ट्रेलियामधील ७३, कुवेत मधील ४९, जर्मनीतील ४७ व सौदी अरेबियातील ४२ अशा अनेक देशातील भाविकांनी या सेवेचा लाभ घेतल्याचे जिल्हा सूचना अधिकारी के. बी. कोंडेकर आणि अतिरिक्त जिल्हा सूचना अधिकारी पी. एन. रुकमे यांनी सांगितले.

**Sakal Paper:**

# हजारो भाविकांनी घेतले तुळजाभवानीचे ऑनलाइन दर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

उस्मानाबाद, ता. १० : जगभरातील भक्तांना तुळजाभवानी देवीचे दर्शन घेण्यासाठी देवस्थानने सुरू केलेल्या ऑनलाइन सुविधेतून यंदाच्या नवरात्र महोत्सवात आतापर्यंत ६४ हजार ८०६ भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला. यात अमेरिका, कॅनडा, सौदी अरेबिया, कुवैत आदी देशांतील भाविकांचा समावेश आहे. आतापर्यंत या सुविधेच्या माध्यमातून १२ लाख १२ हजार २६० भाविकांनी देवीचे दर्शन घेतले आहे.

तुळजाभवानी देवी लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. राज्याच्या विविध भागांसह देश-विदेशातील भाविकही देवीच्या दर्शनाला येतात. सध्या सुरू असलेल्या शारदीय नवरात्र महोत्सवात दररोज लाखो भाविक येत आहेत. असे असले तरी यातील अनेक भाविकांना देवीच्या दर्शनासाठी हजर राहता येत नाही. त्यासाठी मंदिर प्रशासनाने ऑनलाईन दर्शनाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. नवरात्र महोत्सवाच्या काळात आतापर्यंत ६४ हजार ८०६ भक्तांनी देवीचे दर्शन घेतले आहे. यामध्ये अमेरिकेतील एक हजार ६८१, युनायटेड अरबमधील २३७, कॅनडा २२२, इंग्लंड २०८, सिंगापूर १५४, ऑस्ट्रेलिया ७३, कुवैत ४९, जर्मनी ४७, सौदी अरेबिया ४२ आदी देशांतील भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला आहे. दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून ऑनलाईन दर्शनसाठी सुविधा उपलब्ध आहे. http://osmanabad.nic.in या संकेतस्थळावर देवीचे ऑनलाईन दर्शन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.